# ‘टॅली.ईआरपी ९ सीरीज ‘ए’ रीलिज ३.०’ सोल्यूशन सादर

पुणे : बिझनेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर कंपनी असलेल्या टॅली सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडने टॅली.ईआरपी ९ सीरीज ए रीलिज ३.० हे नवे सुधारित सोल्यूशन सादर केले आहे. व्यवसायाच्या अखंड अंमलबजावणीच्या हेतूने त्याची खास रचना करण्यात आली आहे. यात अनेक वैशिष्ट्ये व सुधारित सुविधा आहेत. टॅली.ईआरपी ९मध्ये रुपयाचे नवे चिन्ह अंतर्भूत करण्यात आले आहे. द्विदिश भाषा वैशिष्ट्यामुळे सोल्यूशनची व्याप्ती आता पश्चिम आशियापर्यंत वाढली आहे. जॉब वर्क वैशिष्ट्यामुळे व्यवसाय प्रक्रिया, तर इन्कमटॅक्स व्हाया पेरोल वैशिष्ट्यामुळे वेतन तपशील प्रक्रिया अत्यंत सोप्या झाल्या आहेत. या सर्व वैशिष्ट्यांमुळे टॅली हे आता भारताचे सर्वाधिक सर्वंकष असे व्यवसाय व्यवस्थापन सॉफ्टवेअर ठरले आहे.

यासंदर्भात कंपनीचे सहायक उपाध्यक्ष अरविंद के. एस. म्हणाले, की या सोल्यूशनमधील बँकिंग मोड्युलमुळे व विशेषतः तारीख, भरणा साधने (पेमेंट मोड) किंवा व्यवहारांची साधने अशा फिल्टर्समुळे व्यवहारांची नोंद, अंमलबजावणी, देखरेख अगदी सोपी झाली आहे. रिकन्सिल न झालेले बँक व्यवहार चालू वर्षातून पुढील वर्षात आपोआप कॅरी फॉरवर्ड होत असल्याने वेळ वाचतो, चुका कमी होतात व उत्पादकता वाढते.